दिनांक 08/08/ 2024 रोजीचा प्रशासकीय ठराव क्रमांक 33

विषय – विटा शहर दुसरी सुधारित विकास योजना मधील जुना गट नंबर 481 नवीन विटा पूर्व 95 व जुना गट नंबर 482 नवीन विटा पूर्व 96 याचा शेती तथा ना विकास झोन मधून रहिवास झोन मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणे बाबत.

संदर्भ -1.श्री दुर्योधन बाळू कदम, श्री सुनील रामचंद्र तारळेकर व श्री कृष्णत बाबुराव मदने यांचा दिनांक 07/03/2024 रोजीचा अर्ज.

2. प्रशासकीय ठराव क्रमांक 7 दिनांक 24/06/2024
3. दि. 27/06/2024 रोजी प्रसिद्ध झालेला राजपत्रा मधील जाहीर सूचना.
4. दि.09/07/2024 रोजी दैनिक जनमत मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना.
5. दि.01/07/2024 रोजी दैनिक महासत्ता मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना.
6. प्रस्तावित फेर बदलामुळे बाधित होणाऱ्या लोकांना दि. 24/06/2024 रोजी देण्यात आलेली नोटीस
7. दिनांक 31/07/2024 ने रचना सहायक, सहायक नगररचनाकार, मुख्याधिकारी यांचे कडील मंजूर टिप्पणी.

विटा शहर मंजूर विकास योजना (दुसरी सुधारित) ही TPS-2009/1138/CR-1964/09/UD-13 दिनांक 31/08/2009 ने मंजूर झाली असून दिनांक 30/10/2009 पासून अंमलात आलेली आहे. त्यानुसार जुना गट नंबर 481 व 482/1 (नवीन अनुक्रमे विटा पूर्व 95 व 96/1) हे शेती तथा ना विकास विभागात समाविष्ठ आहेत. सदर क्षेत्राचे झोन बदल करून रहिवासी झोन करून मिळावा याबाबत श्री दुर्योधन बाळू कदम, श्री सुनील रामचंद्र तारळेकर व श्री कृष्णत बाबुराव मदने यांचे अर्जावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये प्रशासकीय ठराव क्रमांक 7 दिनांक 24/06/2024 ने प्राथमिक मंजूरी देणेत आलेली होती. याकामी नगरपरिषदेने महाराष्ट शासन राजपत्र मध्ये मराठी व इंग्रजी भाषेत अधिसूचना दिनांक 27/06/2024 रोजी प्रसिद्ध करणेत आली होती. तसेच दैनिक महासत्ता मध्ये दिनांक 01/07/2024 व दैनिक जनमत मध्ये दिनांक 09/07/2024 रोजीच्या अंकात अधिसूचना प्रसिद्ध झाली होती. तसेच प्रस्तावित फेर बदलामुळे बाधित होणाऱ्या लोकांना दि. 24/06/2024 रोजी नोटीस देणेत आली आहे. तरी महाराष्ट शासन राजपत्र मध्ये प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून एक महिना कालावधीत एकही सूचना/हरकत प्राप्त झाली नाही.

त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये गौणफेरफार करणेस अंतिम मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
(डॉ विक्रम बांदल)
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक  08/08/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 34

विषय – विटा नगरपरिषद नगररचना विभागास All in one Desktop GeM पोर्टल वरून खरेदी  करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ-  मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 06/08/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

1) JKSSE Intel Core i5 All in One PC with 21.5 Inch Display/ Windows 11 Professional  (मे लोरेक्स इन्फोटेक) र.रू.86,676/-

2) ALGOPLUS Intel Core i9 All in One PC with 23.8 Inch Display/ Windows 11 Professional र.रू.1,15,000/-

3)PLEXTEK Intel Core i9 All in One PC with 21.5 Inch Display/ DOS र.रू.1,17,000/-

उपरोक्त निविदापैकी JKSSE Intel Core i5 All in One PC with 21.5 Inch Display/ Windows 11 Professional  (मे लोरेक्स इन्फोटेक) यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक  08/08/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.35

विषय – सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता पाणीपुरवठा व विदयुत विभागासाठी मनुष्यबळ पुरवठा करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ-  मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दिनांक 07/08/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता पाणीपुरवठा व विदयुत विभागासाठी मनुष्यबळ पुरवठा करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) श्री.गजानन रामचंद्र निकम         प्रति दिवस प्रति एक कामगार र.रू.767.000 सर्व करासहित
2) सुहेल सलिम तांबोळी               प्रति दिवस प्रति एक कामगार र.रू.849.600 सर्व करासहित
3) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे        प्रति दिवस प्रति एक कामगार र.रू.814.200 सर्व करासहित

उपरोक्त ई निविदापैकी श्री.गजानन रामचंद्र निकम यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 08/08/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 36

विषय – घोगांव जॅकवेल येथील नवीन स्वीच रूम बांधणेत आलेली आहे त्यावरती अस्तित्वातील ट्रान्सफार्मर शिफ्टींग करणे व रिपेअरींग करणे व तदअनुषंगिक कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दिनांक 07/08/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत र.रू.32.00 कोटीची पाणी पुरवठा योजना पुर्ण केलेली आहे. सदर शहरास पिण्यास पाणी पुरवठा करणारे जॅकवेल घोगाव येथील कृष्णा नदीच्या काठावर असून तेथील ट्रान्सफार्मर कर्मचारी रूमच्या वरील अस्तित्वातील ट्रान्सफार्मर नवीन बांधलेल्या स्वीच रूमच्या साईटच्या कट्टयावरती ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कामे करून घेणे आवश्यक आहे.

1) 800 के.व्ही. ट्रान्सफार्मर शिफ्ट करणे व रिपेअरींग करणे.
2) ट्रान्सफार्मरला आर्थींग करणे व केबल कनेक्शन करणे.
3) ट्रान्सफार्मर शिफ्ट केलेनंतर त्यास नवीन वीज कनेक्शन करते वेळी लागणारे इलेक्ट्रीक साहीत्य पुरवठा करणे.

वरीलप्रमाणे काम करून घेणे अत्यावश्यक आहे. सदरची कामे मुळ अंदाजपत्रकात समाविष्ठ नाहीत. त्यामुळे त्याचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करून केलेले आहे. सदर अंदाजपत्रकाची रक्कम रू.4,83,645/- इतकी आहे. तरी याकामी सन 2024-2025 या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये रू.15.00 लक्ष तरतूद धरणेत आलेली आहे.

तरी घोगांव जॅकवेल येथील नवीन स्वीच रूम बांधणेत आलेली आहे त्यावरती अस्तित्वातील ट्रान्सफार्मर शिफ्टींग करणे व रिपेअरींग करणे व तदअनुषंगिक कामे करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 08/08/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 37

विषय – घोगांव जॅकवेल येथील नवीन स्वीच रूम बांधणेत आलेली आहे त्याठिकाणी सर्व पॅनेल शिफ्ट करणे व चालू करणे व तदअनुषंगिक कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दिनांक 07/08/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत र.रू.32.00 कोटीची पाणी पुरवठा योजना पुर्ण केलेली आहे. शहरास पिण्यास पाणी पुरवठा करणारे जॅकवेल घोगाव येथील कृष्णा नदीच्या काठावर असून तेथे नवीन बांधणेत आलेल्या स्वीच रूम बांधणेत आलेली आहे. रूम पासून मोटरपर्यत जास्त अंतर असलेने मोटरमध्ये आवाज आल्यास बंद करणेसाठी रूम मध्ये जावावे लागते. त्याचे अंतर जास्त असलेमुळे मोटर बिघडणेची शक्यता जास्त आहे. त्याकरिता स्टार्टर मधून केबल टाकून जॅकवेल मध्ये मोटर चालू बंद करणेसाठी केबल टाकणे व तदअनुषंगिक कामे करणे गरजेचे आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कामे करून घेणे आवश्यक आहे.

1) ट्रान्सफार्मरला केबल पुरवठा करणे व कनेक्शन करणे.
2) स्टार्टर पासून जॅकवेल पर्यत केबल टाकणे व कनेक्शन करणे.
3) जॅकवेल मध्ये मोटर चालू करणेसाठी ऑन ऑफ पुश बटन बसविणे व इलेक्ट्रीक साहीत्य पुरवठा करणे.

वरीलप्रमाणे काम करून घेणे अत्यावश्यक आहे. सदरची कामे मुळ अंदाजपत्रकात समाविष्ठ नाहीत. त्यामुळे त्याचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करून केलेले आहे. सदर अंदाजपत्रकाची रक्कम रू.4,55,859/- इतकी आहे. तरी याकामी सन 2024-2025 या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये रू.15.00 लक्ष तरतूद धरणेत आलेली आहे.

तरी घोगांव जॅकवेल येथील नवीन स्वीच रूम बांधणेत आलेली आहे त्याठिकाणी सर्व पॅनेल शिफ्ट करणे व चालू करणे व तदअनुषंगिक कामे करणेस मंजूरी देत आहे.याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा